बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक २३ | बुधवार,दि.१४ मे २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027

## दहावीतही मुलीच ठरल्या जिल्ह्यात सरस

### बोर्ड परीक्षेत हर्षिता, स्वाती अव्वल तर सीबीएसईत जीविधा, अन्ययाने मारली बाजी : स्टार इंटरनॅशनल स्कूलचा उत्कृष्ट निकाल







**गोंदिया :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडलाच्यावतीने घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत परीक्षा इयत्ता दहावीचा निकाल मंगळवारी (दि.१३) जाहीर झाला. यात नागपूर विभागात १२ वी नंतर आता दहावीच्या परीक्षेतही गोंदिया जिल्ह्याने बाजी मारली आहे. जिल्ह्याचा निकाल ९२.८४ टक्के लागला असून विभागात जिल्हा दुसऱ्या स्थानी आहे. स्टार इंटरनॅशनल स्कूलच्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे गोंदिया शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा वर्षा पटेल, सचित माजी आमदार राजेंद्र जैन, संचालक निखिल जैन व प्राचार्या रत्ना खन्ना यांनी कौतुक केले.

इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत गौदिया येथील विवेक मंदिर शाळेची हर्षिता अनिल मदनकर व स्वाती सुनीलकुमार श्रीभाद्रे या दोन्ही विद्यार्थिनींनी ५०० पैकी ४८७ गुण प्राप्त करून जिल्ह्यात संयुक्तपणे अतल स्थान प्राप्त केले. तर केंद्रीय माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) दहावी परीक्षेत गोंदिया येथील स्टार इंटरनॅशनल स्कूलची जीविधा अरुणकुमार हेडाऊ व विवेक मंदिर स्कूलची अन्यया प्रशांत मेश्राम या ९८.०२ टक्के गुण प्राप्त करून जिल्ह्यात अव्वल ठरल्या आहे. विशेष म्हणजे गोंदिया येथील स्टार इंटरनॅशनल स्कूलने अल्पावधीत उत्तुंग भरारी घेतली. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत परीक्षा इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा जिल्ह्याचा एकूण निकाल ९२.८४ टक्के लागला. या परीक्षेसाठी जिल्ह्यातील एकूण १८२५९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १८१७४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यापैकी १६८७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यात ८५१९ विद्यार्थी तर ८३५४ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या. विद्यार्थ्यांची उत्तीर्ण होण्याची टक्केवारी २०.१० टक्के तर ९५.८१ टक्के विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या, दहावीच्या निकालातही मुलांपेक्षा मुलीच सरस ठरल्या आहेत. दहावी बोर्ड परीक्षेत जिल्ह्यातून द्रितीय क्रमांक प्रोग्रेसिव्ह हायस्कूलची विद्यार्थिनी रिंकू सिंगणजुडे हिने ४८६ गुण तर स्थानिक शारदा इंग्लिश हायस्कूलची विद्यार्थिनी सेजल आर. यादव या विद्यार्थिनीने ४८५ मूण प्राप्त करून जिल्ह्यात सरस ठरल्या. तर सीबीएसई दहावी परीक्षेत स्टार इंटरनॅशल स्कूलचे वैर्दात रहांगडाले ९७.६ टक्के, लावण्या तुलसीदास निंबेकर ९७.२ टक्के गुण प्राप्त केले.

**दहावीत मुलींचाच डंका**

दहावी बोर्ड परीक्षेच्या निकालातही मुलींचाच इंका कायम ९४.३३ आहे. जिल्ह्यात ८७१९ मुलींनी परीक्षा दिली. त्यापैकी ८३५४ मुली उत्तीर्ण झाल्या. त्यांची टक्केवारी २५.८१ टक्के आहे. तर ९४५५ मुलांनी परीक्षा दिली त्यापैकी ८५१२ मुले उत्तीर्ण झाले. मुलांपेक्षा मुलींची उत्तीर्ण होण्याची टक्केवारी अधिक आहे. तर बारावीच्या परीक्षेप्रमाणेच दहावीच्या परीक्षेत मुलींचा डंका कायम आहे.

**आमगाव तालुक्याचा सर्वाधिक निकाल**

इयत्ता दहाची बोर्ड परीक्षेत जिल्ह्यात आमगाव तालुक्याचा ९४.३३ टक्के सर्वाधिक निकाल लागला. तर सर्वांत कमी ८८.४६ टक्के निकाल गोरेगाव तालुक्याचा लागला. गोंदिया १३.८४ टक्के, अर्जुनी मोरगाय ९३.३८ टक्के, देवरी १२.०५ टक्के, सडक अर्जुनी ९२.३५ टक्के, सालेकसा ९०.८१ टक्के, तिरोडा तालुक्याचा निकाल ९३.८९ टक्के लागला.

## सीबीएसई बारावी परीक्षेत प्रोग्रेसिव्हचा हर्षित टॉप



**गोंदिया :** केंद्रीय माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) घेतलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवारी (दि.१३) जाहीर केला. त्यात गोंदिया येथील प्रोग्रेसिव्ह इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी हर्षित अमित गोपलानी यांने ९५.६० टक्के गुण प्राप्त करत जिल्ह्यात टॉप केले तर साकेत पब्लिक स्कूलचा हिमांशू शरणागत याने ९३.६० टक्के गुण घेऊन द्रितीय व तिरोडा येथील मेरिटोरिअस विद्यालयाची मान्यता देवेंद्र असाटी हिने ९२.२ टक्के गुण प्राप्त करुन जिल्ह्यातून तृतीय स्थान प्राप्त केले. विशेष म्हणजे यंदा सीबीएसई बारावी परीक्षेत मुलांनी बाजी मारली आहे. सीबीएसई बारावी परीक्षेत प्रोग्रेसिव्ह इंग्लिश स्कूलमधून गुरुक्रिष्णा रोडा ९२.८० टक्के, हर्षिता खिल्लारी ९२.२० टक्के, चिन्मय वासनिक ९२.२० टक्के, प्रणय टेंभरे ९१.८० टक्के, शुभ जयपुरिया ९२.८० टक्के, जेनी अग्रवाल ९०.४२ टक्के, प्रणव मेमाने ८९.८० टक्के, मधुरा रत्नपारखी ८९.६० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाले. सर्व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रोग्रेसिव्ह इंग्लिश स्कूलचे संचालक नीरज कटकवार, पंकज कटकवार व प्राचार्यांनी कौतुक केले आहे तर तिरोडा येथील मेरीटोरियस स्कूलच्या बारावीच्या विज्ञान शाखेत मान्यता देवेंद्र असाटी हिने ९२.२ टक्के गुण प्राप्त करून तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे तर गोंदिया पब्लिक स्कूलची याना सिंघानिया ९१.८० टक्के, आर्यन कुंभलवार ८७.६० टक्के, हाफिज कुरेशी ८४ टक्के, प्रताप भादूपोते ८३.८० टक्के, डिंपल जमाईवार ८२.४० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाले.

**शंभर टक्के निकालाची परंपरा कायम**

जाहीर करण्यात आलेल्या निकालांमध्ये बहुतांश शाळांचे निकाल शंभर टक्के लागल्याचे दिसून आले. यामध्ये शहरासह ग्रामीण भागातील शाळांनीही उत्कृष्ट कामगिरी केल्याचे दिसून आले.

## गोंदिया जिल्हा भाजपा जिल्हाध्यक्ष पदावर सीताबाई रहागंडालेंची निवड

**गोंदिया –** भारतीय जनता पक्षाच्यावतीने संघटनात्मक निवडणुका पार पाडण्याची प्रकिया असून तालुका व मंडळ अध्यक्षांच्या नियुक्तीनंतर आज १३ मे रोजी गोंदिया जिल्हा भारतीय जनता पक्षाच्या अध्यक्षपदावर पहिल्यांदाच महिलेला स्थान देण्यात आले आहे.माजी जिल्हा परिषद सदस्या व भाजप महिला आघाडीच्या माजी महिला अध्यक्ष सीताबाई कमलेश रहागंडाले यांची आज भारतीय जनता पक्षाच्या जिल्हाध्यक्ष पदी निवड करण्यात आली.मावळते अध्यक्ष एड.येशुलाल उपराडे यांनी श्रीमती रहागंडाले यांचे अभिनंदन केले आहे

## १०० टक्के निकाल देणाऱ्या शाळा

गुजराती नॅशनल हायस्कूल, गोंदिया
आदर्श सिंधी विद्या मंदिर, हायस्कूल गोंदिया
जि.प. हायस्कूल बनाथर
डॉ. आंबेडकर विद्यालय गोंदिया
रविंद्रनाथ टागोर हायस्कूल, रेलटोली, गोंदिया
रमाबाई आंबेडकर हायस्कूल, गोंदिया
राष्ट्रीय माध्यमिक विद्यालय, सावरी, गोंदिया
शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, मजीतपूर
श्री महावीर मारवाडी स्कूल, गोंदिया
श्री गुरुनानक इंग्रजी माध्यमिक विद्यालय, गोंदिया
श्री शंकरलाल अग्रवाल माध्यमिक शाळा बिरसोला
साकेत पब्लिक हायस्कूल, गोंदिया
निर्मल स्कूल गोंदिया
गुरुनानक हिंदी माध्यमिक विद्यालय गोंदिया
विवेक मंदिर हायस्कूल, गोंदिया
जानकीदेवी चौरागडे हायस्कूल गोंदिया
प्रोग्रेसिव्ह इंग्रजी शाळा, गोंदिया
जयरामदास आदिवासी माध्यमिक आश्रमशाळा कामठा
हिंदल माध्यमिक शाळा, मुंडीपार
मनोहरभाई पटेल शाळा कुडवा
लक्ष्मीबाई टेंभरे हायस्कूल रायपूर
राजस्थानी इंग्रजी शाळा, गोंदिया
संस्कार हायस्कूल गोंदिया
मातोश्री मीराबाई आदिवासी शाळा गोंदिया
चंचलबेन मनिभाई पटेल हायस्कूल गोंदिया
स्वामी टेऊराम आदर्श स्कुल गोंदिया
आदर्श इंग्रजी हायस्कूल, फुलचूर टोला
लिटिल फ्लॉवर हायस्कूल गोंदिया
शारदा इंग्रजी हायस्कूल, गोंदिया
अनुसूचित जाती अॅन्ड नवबौद्ध मुलांची निवासी शाळा,
प्रोग्रेसिव्ह मराठी माध्यमिक शाळा, गोंदिया
एसेंट पब्लिक स्कूल, मुरीं
नॅशनल पब्लिक स्कूल पिंडकेपार
चित्रांस अकॅडमी गोंदिया
गुरुकुल प्रायमरी स्कूल, गोंदिया
एकता इंग्रजी शाळा, गोंदिया
नूतन इंग्रजी शाळा, गोंदिया
एस.बी. नॅशनल इंग्रजी शाळा, गोंदिया
मु. जीवन शाळा अॅन्ड ज्युनिअर कॉलेज गोंदिया
आयडियल अकॅडमी, गोंदिया (खुर्द)
ऑरचिट इंटरनॅशनल स्कूल, गोंदिया
जे.जे. माध्यमिक विद्यालय ठाणा
जे.जे. माध्यमिक विद्यालय कातुर्ली
गुरुकृपा आदिवासी माध्यमिक आश्रमशाळा, ठाणा
छत्रपती विद्यालय सीतेपार
सम्राट अशोक विद्यालय, उमरी (नवेगावबांध)
अमित हायस्कूल, धमदी टोला / पळसगाव
आदिवासी विकास विद्यालय, पळसगाव
जी.एम.बी. हायस्कूल, अर्जुनी मोरगाव
न्यू मून इंग्रजी विद्यालय, गोंदिया
सनशाईन इंग्रजी शाळा, गोंदिया
शासकीय माध्यमिक आश्रमशाळा कडीकसा
शासकीय माध्यमिक आश्रमशाळा बोरगाव बाजार
डॉ. बाबासाहेब आंबडेकर विद्यालय, आलेवाडा
छत्रपती शिवाजी हायस्कूल, देवरी
माध्यमिक आश्रमशाळा, पुराडा / देवरी
सीता पब्लिक स्कूल, देवरी
ब्लोसन पब्लिक स्कूल
जी. ई. एस. हायस्कूल, मोहाडी / गोरेगाव
ब्रिजलालजी कटरे हायस्कूल, शाहरवाणी
किरसान मिसन स्कूल, गोरेगाव
मॉडल कॉन्व्हेंट हायस्कूल, ठाणा
यशवंत राणे पब्लिक स्कूल
नॅशनल मदर्स पब्लिक स्कूल, गोरेगाव
जि.प. हायस्कूल, सौंदड
बाळासाहेब तिरपुडे हायस्कूल, शेंडा
अनु. जाती नवबौद्ध मुलांची निवासी शाळा
गि–हेपुंजे इंग्रजी पब्लिक शाळा
जानकीबाई कन्या शाळा, सालेकसा
माध्यमिक आश्रम स्कूल, जमाकुडो / दरेकसा
जि.प. माध्यमिक शाळा करटी
सिद्धार्थ हायस्कूल, ठाणेगाव
माध्यमिक आश्रमशाळा, कोयलारी
रविंद्रनाथ टागोर माध्यमिक शाळा, मेंढा
आदि. माध्यमिक विद्यालय, नवेगाव खुर्द
अनु. जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय शाळा
ग्लोरिअस माऊंट अकॅडमी

## पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल देवरी इथून आस्था डोये तालुक्यातून प्रथम



**देवरी –** पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल देवरी येथील इयत्ता दहावीचा आज लागलेल्या निकालामध्ये आस्था संजय डोये हिने ९७.८० टक्के अंक घेत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला.तसेच नकुल रामाजी ढोबले ८६.८० द्रितीय, यश प्रभू मनगटे ८६.०० तृतीय ठरला. ६९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी गुणवत्ताधारक १३ विद्यार्थी, प्रथम श्रेणी २१ व द्रितीय श्रेणीत ११ असा एकूण शाळेच्या ९६ टक्के निकाल लागला.

पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल देवरी ही शाळा सन २०१३ ते १८ या काळात बंद पडलेली असताना श्री.संयाम व त्यांची चमू यांनी तसेच गटशिक्षणाधिकारी महेंद्र मोटघरे यांच्या प्रशासकीय नेतृत्वाखाली ही शाळा सुरू करण्यात आली. गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना दीपक कापसे मुख्याध्यापक यांनी भविष्यात या शाळेची प्रगती अधिकाधिक वाढवण्याच्या संकल्प व्यक्त केला. शाळेचे अध्यक्ष राजू चांदेवार व शाळा समिती अध्यक्ष जिल्हा परिषद सदस्य संदीप भाटिया,उपाध्यक्ष अर्चनाताई ताराम यांनी सुद्धा भावी काळात अशेच सहकार्य करण्याची भावना व्यक्त केली.वर्ग शिक्षक टेटे व इतर सर्व विषय शिक्षक यांनी वरील विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणात खूप मेहनत घेतली व त्यांना यशश्री प्राप्त करून दिली.यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन महेंद्र मोटघरे गटशिक्षणाधिकारी, एच.जी. राऊत शिक्षण विस्तार अधिकारी ,धनवंत कावळे गट समन्वयक ,ओमप्रकाश ढवळे केंद्रप्रमुख ,राजेश चांदेवार अध्यक्ष संदीपजी भाटिया अध्यक्ष शाळा समिती ,अर्चना ताराम उपाध्यक्ष, राजेंद्र मेश्राम माजी प्राचार्य ,दिपक कापसे मुख्याध्यापक , डिलेस टेटे, लांजेवार ,पिल्लारे , खंडारे ,कुरधने , सहारे , कुंजाम ,कुथीर, नाईक ,गावाकडर मॅडम ,फुन्ने मॅडम ,ठवरे मॅडम, लीलारे मॅडम ,दहिफळे मॅडम, आनंद टेकाम बाबूजी तसेच सर्व शाळा व्यवस्थापन समिति सदस्य व पालकांनी पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या.

## संसदेच्या अभ्यासातच लोटले वर्ष



**गोंदिया:–** जिल्ह्याला दोन खासदार लाभले. त्यांच्या खासदारकीला आता वर्ष लोटले. दोन्ही खासदारांची ही दिल्लीत जाण्याची पहिलीच वेळ आहे. त्यामुळे खासदारकीचा हा वर्ष केवळ अभ्यासातच गेला. असे असले तरी दोन्ही खासदारांनी शिक्षण, आरोग्य, रोजगाराचे प्रश्न संसदेच्या अधिवेशनात उपस्थित केले. आता पुढची चार वर्षे त्या खासदारांना प्रत्यक्षात मोठे प्रकल्पांसह त्यांच्या क्षेत्रातील समस्यांना न्याय देण्याची जबाबदारी असणार आहे.

भंडारा–गोंदिया लोकसभा मतदारसंघाचे खासदार प्रशांत पडोळे यांनी तिरोडा तालुक्यातील नागरिकांच्या समस्या ऐकून घेण्याकरीता तिरोडा पंचायत समितीच्या सभागृहात जनता दरबार भरविण्याच्या सूचना केल्या. प्रशासनाने देखील होकार दिला. सर्व तयारी झाली असताना उपविभागीय अधिकारी यांनी जनता दरबाराला परवानगी नाकारली. त्याची सूचना देखील खासदारांना मिळाली नाही. त्यामुळे त्यांना पंचायत समिति कार्यालयाच्या बाहेर मोकळ्या जागेत सभा घ्यावी लागली.

जिल्ह्यातील पाच तालुके भंडारा–गोंदिया लोकसभा मतदारसंघात मोडतात. तर उर्वरित आमगाव, देवरी आणि सालेकसा तालुके गडचिरोली–चिमूर मतदारसंघात मोडतात. गडचिरोली मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व डॉ. नामदेव किरसान करतात. तर भंडारा–गोंदिया मतदारसंघाचे नेतृत्व डॉ. प्रशांत पडोळे करतात. हे दोन्ही खासदार संसदेत जाण्याची त्यांची पहिलीच वेळ आहे. आता त्यांच्या खासदारकीला संपूर्ण वर्ष लोटले. असे असले तरी खासदार प्रशांत पड़ोळे यांनी साकोली येथे बंद पडलेला भेल प्रकल्प सुरू करण्याची मागणी लावून धरली.

जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेकडे त्यांनी विशेष लक्ष घातले असून गावागावात जावून जनतेच्या समस्या जाणून घेण्याचा सपाटा त्यांनी लावला आहे. त्यातच शिक्षणाकडे देखील त्यांनी लक्ष घातले. त्यासंदर्भात त्यांनी संसदेच्या अधिवेशनात देखील मुद्दा उपस्थित केला. तर दुसरीकडे खा. नामदेव किरसान यांचे क्षेत्र प्रामुख्याने आदिवासी क्षेत्रात मोडते. या क्षेत्रातील शिक्षण आणि आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने त्यांनी संसदेत मुद्दा उपस्थित केला. त्याचप्रकारे सालेकसा येथे इंटरसिटी एक्सप्रेसच्या थांब्यासाठी त्यांनी विशेष लक्ष घातले आहे.


स्थानिक मुद्दे हाताळणे गरजेचे असले तरी एक खासदार म्हणून रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने त्यांनी पाऊल उचलावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## सारस पक्ष्याच्या अधिवासाने गोंदियाच्या वैभवात भर

**गोंदिया: –** जिल्हयाला नैसर्गिक सौंदर्याची अप्रतिम देणगी लाभली आहे. जिल्हा जैवविविधतेने नटला आहे. येथे पक्षी, प्राणी, सुक्ष्मजीवांचा अधिवास आहे. गोंदिया वनपरिक्षेत्रत वास्तव्यास असलेल्या सारस पक्ष्यांमुळे जिल्हयाच्या वैभवात भर पडली आहे.

गोंदिया वनपरिक्षेत्रच्या पुढाकाराने सारस संरक्षण, संवर्धन आता लोक चळवळ झाली आहे. कधीकाळी जिल्हयात सहज आढणारा सारस पक्ष्यांची संख्या कमालीने रोडावली. यावर पक्षीप्रेमींनी खंत व्यक्त करीत त्यांच्या संरक्षण व संवर्धनासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचीका दाखल केली. यावर न्यायालयाने येथील प्रशासनाला उपाययोजना करण्याचे बजावले. गोंदिया वनपरिक्षेत्रत २ आलेली सारस संख्या आता २६ वर आली आहे. पुरातन ग्रंथ व रामायणमध्येही या पक्ष्यांचा उल्लेख आहे. सारसाला शेतकरी मित्रब, प्रेमाचे व समृद्धीचे प्रतिक मानले जाते. आयुष्यभर हा पक्षी जोडीदारासह राहतो.

दुर्दैवाने एकाचा मृत्यू झाल्यास आयुष्यभर दुसरे जोडीदार करीत नाही. सारस पक्षी नामशेष होर्णा?या मार्गावर आहेत. गोंदिया वनपरिक्षेत्रत सारस पक्षी ब?यापैकी आढळत होती. मात्रब त्यांच्या अधिवासात झालेला मानवी हस्तक्षेपांमुळे त्यांना धोका निर्माण झाला. पक्ष्यांसाठी नंदनवन असलेल्या नवेगांवबांध



तलावात मोठ्या प्रमाणात सारस पक्षी आढळत होती. परंतु सध्याच्या घळीला नवेगांवबांध तलाव व परिसरामध्ये सारस पक्षी नामशेष झाले आहेत. तलाव, धान शेती व पानथळ जागी सारसांचे अधिवास असलेल्या ठिकाणांवर मानवी हस्तक्षेप, अतिक्रमण, शिकार व अंडे उबविण्यापुर्वी पळवून नेल्यामुळे सारसांची संख्या चिंताजनक पातळीस पोहचली. येथील वनपरिक्षेत्रब अधिकारी, कर्मचारी यांनी निसर्ग संवर्धनासाठी काम कर्णा?या स्वयंसेवी संस्था, शेतकरी, ग्रामस्थ सारस संवर्धनासाठी सारसावले. त्यांच्या प्रयत्नाला बऱ्यापैकी यश आले आहे. गावागावांत सारस संवर्धनाबाबत जागृती करण्यात आली.

सारसांचे अधिवास व सारसांची घरटी वाचविण्यासाठी निरंतर प्रयत्न करण्यात आले. सारस पक्ष्यांची घरटी सुरक्षित रहावी यासाठी शेतकरी, स्वयंसेवी संस्था, शाळा, महाविद्यालय व गावकऱ्यांची मदत घेण्यात आली. यामुळे घरटी वाचविने शक्य झाले. जिल्हयात यावर्षीच्या सारसपक्षी गणनेत आढळलेल्या २८ सारसांपैकी २६ सारसांची नोंद गोंदिया वनपरिक्षेत्रत झाली. सारस संवर्धनाला आता चळवळीचे स्वरुप प्राप्त झाले आहे. भविष्यात जिल्हयात सारस हब तयार व्हावे म्हणुन शासन–प्रशासन, सेवाभावी संस्था व नागरीक पुढाकार घेत आहेत.

### आमगावात प्रथमच आढळले सारस पक्षी

**तालुक्यात सारस पक्ष्यांचा अधिवास पहावयास मिळतो. त्यामुळे गोंदिया जिल्ह्याची ओळख सारस पक्ष्यांच्या नावानेही होऊ लागली आहे. मात्रब सारस पक्ष्यांच्या अधिवास क्षेत्रब असुरक्षित असल्यामुळे दिवसेंदिवस सारस पक्ष्यांची संख्याही कमी होवू लागली आहे. त्यातच १ मे रोजी सकाळी ११ वाजता सुमारास आमगाव लगतच्या शेतशिवारात चार सार पक्षी आढळले. विशेष म्हणजे, आमगाव तालुक्यात सारस पक्ष्यांची पहिल्यांदाच नोंद झाली आहे. यामुळे पक्षीप्रेमींमध्ये आनंद व्यक्त केला जात आहे.आमगाव येथील पक्षीप्रेमी ए. एस. वलथरे यांच्या घरामागे असलेल्या शेतात चार सारस पक्षी जोडीने आढळले. दरम्यान त्या सारस पक्ष्यांचे छायाचित्रब मोबाईलमध्ये कॅमेराबध्द केले.आमगावात खूप वर्षानंतर पहिल्यांदाच सारस पक्ष्यांची नोंद झाली.**

**सारसांच्या रोजच्या अधिवासाची माहिती मिळावी यासाठी वनकर्मचारी, शेतकऱ्यांचे व्हॉटस अ?प ग्रुप तयार केले. घरटी नष्ट होऊ नये, अंडी चोरीला जाऊ नये, संरक्षणासाठी वनकर्मचारी नेमले. वन्यजीव प्रेमी व छायाचित्रकार यांच्या हस्तक्षेपावर आळा घालण्यासाठी ठिकठिकाणी शासकीय निधी विना मचान उभारले. घरटी व अंडी वाचविण्यासाठी नवेगांव–नागझीरा व्याघ्र प्रकल्प फाऊंडेशनच्या मदतीने प्रत्येकी २५ हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम देण्यात आली. वेळोवेळी वनकर्मचारी, शेतकरी, स्वयंसेवी संस्था, शाळा, महाविद्यालय व गावकऱ्यांची मदत घेऊन सारस संवर्धनासाठी कामे केली. वनपरिक्षेत्रत घरट्यांची संख्या १–२ वरुन ६ ने वाढली. अंडयांमधुन १२ पिल्ले जन्मास आली. हा प्रयत्न सारस संवर्धन प्रक्रियेला कलाटणी देणारा आहे.**

**दिलीप कौशिक ,वनपरिक्षेत्रब अधिकारी, गोंदिया**

**सारस पक्ष्याच्या संवर्धनाला घेवून शासन व शेतकऱ्यांनी पाऊल उचलण्याची गरज आहे. आमगाव तालुक्यात पहिल्यादाच सारस पक्षी दिसून आले आहेत. त्यामुळे सारस पक्ष्यांचे अधिवास क्षेत्रब सुरक्षित करण्याची गरज आहे. रासायनिक खताचा वापर कमी करुन सेंद्रिय शेती केल्यास सारस पक्ष्यांच्या अधिवास क्षेत्रत निश्चित वाढ होण्याची शक्यता आहे.–**

**प्रा. डॉ. संतोष डी. पुरी**

## विदर्भातील पहिला बलून बंधारा निर्माण होणार

**गोंदिया –** महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकावर असलेल्या गोंदिया जिल्ह्यातील नदीचे पाणी अडविण्यासाठी आणि हे पाणी सिंचनासाठी वापरण्यासाठी, आमदार विनोद अग्रवाल यांच्या प्रयत्नातून रजेगाव येथे बाघ नदीवर नवीन प्रकारचा बलून धरण बांधण्यात येणार आहे. यासाठी आमदार विनोद अग्रवाल यांनी सरकारला केली विनंती वरुन जलसंपदा विभागाकडून १०९ कोटी रुपये मंजूर झाले आहे. अमेरिका आणि चीनच्या तंत्रज्ञानावर आधारित, गोंदिया तहसीलमधील रजेगाव बाघ नदीवर हा बलून बंधारा बांधला जाणार आहे ज्यामुळे रजेगाव–काटी उपसा सिंचन योजनेला नवीन जीवन मिळेल. भारतात, जळगावमधील गिरणा नदीवर प्रथम प्रायोगिक तत्वावर बलून बैराज बांधण्यात आले, त्यानंतर ते अनेक नद्यांवर बांधण्यात आले, परंतु विदर्भातील गोंदिया जिल्ह्यात ते पहिल्यांदाच बांधले जात आहे. आमदार विनोद अग्रवाल म्हणाले की, अनेक वर्षापूर्वी रजेगाव–काटी उपसा सिंचन योजना करण्यात आली होती परंतु पाणी साठवणुकीअभावी ही योजना बंद अवस्थेत पडून आहे आणि आतापर्यंत ती सिंचनासाठी वापरता आलेली नाही. परंतु आम्ही वारंवार सरकारला रजेगाव बाघ नदीवर बंधारा बांधण्याची विनंती केली, ज्यासाठी सरकारने आम्हाला १०९ कोटी रुपये खर्चाचा बलून धरण दिले आहे. आमदार विनोद अग्रवाल पुढे म्हणाले, हे बलून बॅरेज अमेरिका आणि चीनच्या तंत्रज्ञानावर आधारित आहे. हे धरण हवेच्या दाबाने स्वयंचलितपणे चालेल आणि ते बलून सेन्सर तंत्रज्ञानाने काम करेल. ते बुलेटप्रूफ असेल आणि तळाशी असलेल्या पातळीपर्यंत ३ मीटर पाणी साठवेल. ते पुढे म्हणाले, २५ ते ४० फूट वाळू उरल्यानंतर, त्याखाली सिमेंट काँक्रीट टाकले जाईल ज्यावर ते उभे राहील. बलून धरणातील पाणी साचल्याने सुमारे १० हजार एकर सिंचन क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

# वादळी पावसाने ४१५९ हेक्टर क्षेत्र बाधीत

**गोंदिया:**–एप्रिल, मे महिन्यात झालेल्या अवकाळी वादळी पाऊस व गारपीटने जिल्ह्यातील ४१५९ हेक्टर पीक क्षेत्र बाधीत झाले आहे. २६, २७ एप्रिल रोजी झालेल्या गारपीट व वादळी पावसाने ४ हजार १६ हेक्टर तर मे महिन्यात ३, ४, ५ तारखेला बरसलेल्या वादळी पावसाने १४३ हेक्टरमधील पिकांचे प्रचंड नुकसान झाले. दिवसभर उन्ह अनं संध्याकाळी वादळासह पाऊस बरसत असल्याने शेतकऱ्यांची धाकधूक कायम आहे.



जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी धानासह विविध पिकांची लागवड केली आहे. सततच्या अवकाळी वादळी पावसाने शेतकऱ्यांची झोप उडाली आहे. कधी तुरळक, कधी जोरदार सरी तर कधी गारपिटमुळे पिकांचे प्रचंड नुकसान होत आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ७० हजार हेक्टर क्षेत्रात धान व १० हजार हेक्टर क्षेत्रात भाजीपाल्यासह इतर पिकांची लागवड केली आहे. धान पीक कापणीला आले आहे. त्यातच २६ व २७ एप्रिल रोजी गारपीटसह वादळी पाऊस बरसला. याचा फटका ९१ गावांमधील ४ हजार १६ हेक्टर क्षेत्रातील धान, भाजीपाला, फळबागा, मका आणि आंबा आदी पिकांना बसला. गोंदिया तालुक्यातील १२ गावांमधील ३१४ शेतकऱ्यांच्या ६९.३० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. गोरेगाव तालुक्यातील ७ गावांतील २७ शेतकऱ्यांच्या ८.८० हेक्टर पिकांना अवकाळी पावसाचा फटका बसला. अर्जुनी मोरगाव तालुक्यातील १० गावांतील ३०३ शेतकऱ्यांच्या ११५ हेक्टरवरील मक्याचे नुकसान झाले. देवरी तालुक्यातील ४ गावांतील ७ शेतकऱ्यांच्या १.३० हेक्टर क्षेत्रातील कैरींचे नुकसान झाले. सालेकसा तालुक्यात एकागावातील दोन शेतकऱ्यांचे दीड हेक्टर मक्याचे पीक उद्धवस्त झाले. सडक अर्जुनी तालुक्यात तालुक्यात ५७ गावांतील ५ हजार ७९० शेतकऱ्यांच्या ३ हजार ८२० हेक्टर क्षेत्रातील धान, मका आणि आंबा पिकाला फटका बसला. Thunderstorm मे महिन्यात सालेकसा तालुक्यातील ५५ गावांतील ४४ शेतकऱ्यांचे ४२.८२ हेक्टर क्षेत्रातील धान, आंबा पिकांचे नुकसान झाले. गोंदिया तालुक्यातील २५ गावांतील ३५१ शेतकऱ्यांच्या ८८.३२ हेक्टरमधील पीक उध्वस्त झाले. गोरेगाव तालुक्यातील दोन गावांतील ११ शेतकऱ्यांचे ५ हेक्टर, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील ४ गावांतील २१ शेतकऱ्यांचे १२.४० हेक्टर, देवरी तालुक्यातील ४ गावांतील ८ शेतकऱ्यांचे ३.२० हेक्टर, आमगाव तालुक्यातील १८ गावांतील ४० शेतकऱ्यांचे २६ हेक्टर आणि सालेकसा तालुक्यातील दोन गावांतील १२ शेतकऱ्यांच्या ७.९० हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाले. तिरोडा, सडक अर्जुनी तालुक्यातही नुकसानीचा अंदाज आहे. असा १४३ हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाले. चक्रिवादळाचा घरे, गोठे, वीज खांब, तारा, झाडे यांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याची आकडेवारी गोळा करण्याचे काम महसूल विभागातर्फे केले जात आहे.

# जुन्या वैमन्यासातून कारंजा येथे सावकाराची हत्या

**गोंदिया:**– ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत येत असलेल्या कारंजा येथे जुन्या वैमन्यासातून सावकाराची हत्या करण्यात आल्याची घटना फुलचूर ते कवलेवाडा मार्गावरील भद्रुटोलाजवळ आज १२ मे रोजी उघडकीस आली.या हत्या प्रकरणात ४ संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून मृतकाचे नाव महेंद्र मदारकर(४५रा.कारंजा)असे आहे.सदर घटनेची माहिती कारंजा येथील पोलीस पाटील अलका रंगारी यांनी पोलिसांना दिली.त्यानंतर गोंदिया ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक चंद्रकांत काळे हे आपल्या ताफ्यासह घटनास्थळी दाखल होत तपास कार्याला सुरवात केली.सदर मृतकाचा मृतदेह हा गावात एका घराचे बांधकाम



सुरु असलेल्या कॉलमच्या खड्ड्यात आढळून आला.या प्रकरणात माहितीच्या आधारे कारंजा येथीलच राज गब्बर(वय ३५),अजय कलाने(वय ३३),गुलशन उईके(वय ३०)व कृष्ण सत्यवान मेश्राम यांना संशयाच्या आधारे ताब्यात घेण्यात आले आहे.मृतक हा गावात सावकारी करायचा तसेच गुंड प्रवृत्तीचा होता.मृतक महेंद्र मदारकरचा गावातीलच काही तरुणांशी काही दिवसापुर्वी वादावादी झालेली होती.त्यावेळी मदारकरने बघुन घेण्याची धमकी तरुणांना दिली होती. त्यातच आज महेंद्र मदारकर हा सकाळच्या वेळी घराशेजारी फिरत असतांना गावातील तरुणांनी त्याला घेरले,दरम्यान आपला जीव वाचविण्याकरीता महेंद्र हा भ्रद्रुटोल्याच्या दिशेने पळत असताना घराच्या बांधकामाकरीता खोदलेल्या खड्ड्यात पडला.आणि पाठलाग करीत आलेल्या तरुणांनी त्याला तिथेच तलवारीने वार करीत ठार केल्याचे पोलिसांनी सांगितले.

# खरीप हंगामपूर्व जिल्हास्तरीय कृषि निविष्ठा विक्रेत्यांची कार्यशाळा



**गोंदिया:**– खरीप हंगामपूर्व जिल्हास्तरीय कृषि निविष्ठा विक्रेते व कृषि निविष्ठा उत्पादक कंपनीचे प्रतिनिधी यांची कार्यशाळा ७ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समितीचे सभागृहात पार पडली. कार्यशाळचे अध्यक्षस्थानी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी निलेश कानवडे होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषि आयुक्तालयाचे कृषि अधिकारी शाहुराव मोरे उपस्थित होते.

यावेळी शाहुराव मोरे यांनी खरीप हंगामातील खताचे संतुलीत वापर, माती परिक्षणाचे महत्व, धान बियाणेवरील बीज प्रक्रिया, किडरोग व्यवस्थापन व गुणवत्तेच्या निकषावर बियाण्यांची निवड या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच अनाधिकृत व बनावट खत विक्री टाळावी, खतासोबतची लिंकींग न करण्याबाबत व शेतकऱ्यांना प्रमाणित असलेले कृषि निविष्ठा पुरविण्याबाबत सूचना दिल्या.

महाबीजचे प्रतिनिधी सुभाष मेश्राम यांनी साथी पोर्टल विषयी सखोल माहिती दिली. या पोर्टलच्या माध्यमातून बियाणे वितरणाची प्रक्रिया अधिक सुलभ व पारदर्शक कशी होईल याबद्दल मार्गदर्शन केले. सेवासंस्थेचे अध्यक्ष सावन बहेकार यांनी सारस पक्षी संवर्धन व संरक्षण याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी निलेश कानवडे यांनी अनुदानीत खतासोबत इतर दुय्यम खते लिंकींग न करण्याबाबत उपस्थित सर्व खत उत्पादक कंपनीच्या प्रतिनिधींना सक्त सूचना दिल्या. तसेच पॉस मशिन साठा व प्रत्यक्ष साठा यांचे ताळमेळ ठेवणे, विहित नमुन्यात दस्ताऐवज जतन करुन शेतकऱ्यांना देयके देणे व वाजवी दरात कृषि निविष्ठांची विक्री करण्याबाबत सर्व कृषि निविष्ठा विक्रेत्यांना सूचना दिल्या.

यावेळी आरसीएफ कंपनीद्वारे प्रातिनिधिक स्वरुपात ई–पॉस मशिनचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक वाय.बी.बावनकर व मोहिम अधिकारी पी.डी.कुर्वे यांनी सदर कार्यशाळेचे यशस्वीपणे आयोजन केले.

# बाई गंगाबाई रक्तपेढीत त्वरित ब्लड कंपोनंट युनिट सुरू करा

## अन्यथा आंदोलन छेडणार : रक्तमित्रांनी दिला इशारा

**गोंदिया :**– शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतर्गत येणाऱ्या स्थानिक बाई गंगाबाई रक्तपेढीत अद्याप ब्लड कंपोनंट सेपरेशन युनिट कार्यान्वित करण्यात आले नाही. या महत्त्वाच्या सुविधेच्या अभावामुळे यॅलेसिमिया व सिकलसेल अशा गंभीर आजारांनी ग्रस्त निरागस मुलांना वेळेवर प्लाझ्मा, पीआरसी, प्लेटलेट्स अशा आवश्यक रक्तघटकांचा पुरवठा होऊ शकत नाही. त्यामुळे ड कंपोनंट सेपरेशन युनिट सुरू करण्यात यावे, अन्यथा याविरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा रक्तमित्र विनोद चांदवाणी यांनी दिला आहे.

जर लवकरात लवकर बाई गंगाबाई रक्तपेढीत ब्लड कंपोनंट सेपरेशन युनिट

सुरू झाले नाही तर चॅलेसिमियाग्रस्त बालकांचे पालक आणि विविध सामाजिक संस्था यांच्यासह मिळून गोंदिया मेडिकल कॉलेजच्या डीन कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. लगतच्या भंडारा जिल्ह्यात, जिथे रुग्णसंख्या तुलनेने कमी आहे, तिथे ही सुविधा आधीपासूनच उपलब्ध आहे. मात्र गोंदियात, जिथे आरोग्यसेवा आणि रुग्णालयांची संख्या सातत्याने वाढत आहे आणि मध्यप्रदेश व छत्तीसगड या सीमाभागांतूनही मोठ्या प्रमाणावर रुग्ण उपचारासाठी येतात अशा ठिकाणी हे युनिट अद्याप सुरू न होणे ही अत्यंत



दुर्दैवी बाब आहे. मध्यमवर्गीय रुग्णांना ब्लड कंपोनंटची गरज भासल्यास त्यांना खासगी ब्लड बँकांमधून महागात रक्तघटक खरेदी करावे लागतात, त्यामुळे सामान्य याचा आर्थिक फटका बसतो. प्रशासनाने जनहितार्थ मागणी लक्षात घेत बाई गंगाबाई रक्तपेढीत त्वरित ब्लड कंपोनंट सेपरेशन युनिट सुरू करा.

# जि. प. सभापतींच्या उपस्थितीत घरकुल लाभार्थ्यांचा सर्व्हे

अर्जुनी मोरगाव : गावातील कोणताही गरजू लाभार्थी घरकुल आवास योजनेपासून वंचित राहू नये, गरजवंतांना त्यांच्या हक्काचे घर मिळावे यासाठी गावागावात १५ मेपर्यंत सर्वेक्षण अभियान सुरू आहे. जिल्हा परिषद महिला व बाल कल्याण सभापती पौर्णिमा ढेंगे यांनी स्वतः इटखेडा गावात फिरून एकही गरजवंत लाभार्थी घरकुलापासून वंचित राहणार याची काळजी घेत सर्वेक्षण करायला लावले. गरजू लाभार्थ्यांच्या घरी भेट देऊन ग्रामसेवकाला गरजू लाभार्थ्यांचा सर्व्हे करण्यास भाग पाडले.

प्रधानमंत्री आवास योजना टप्पा क्रमांक दोन अंतर्गत ज्या गरजवंतांना घरकुलाची आवश्यकता आहे, अशा लाभार्थ्यांचा सर्व्हे करण्याचे काम सध्या सुरू आहे. तालुक्यातील इटखेडा येथील गरजू लाभार्थ्यांचा सर्व्हे झाला नाही अशी माहिती होताच जि. प. सभापती पौर्णिमा ढंगे यांनी पुढे येत स्वतःच्या उपस्थितीत सर्वेक्षण करायला लावले. प्रधानमंत्री आवास योजनेतून कोणताही गरजू व्यक्ती सुटणार नाही याची खबरदारी घेऊन सभापती ढंगे यांनी ग्रामसेवकाला बोलावून घेतले. गरजू व्यक्तींच्या घरापर्यंत जाऊन त्यांनी आपल्या समक्ष घरकुल आवासचा सर्व्हे करण्यास भाग पाडले. गावामधील कोणताही लाभार्थी घरकुलापासून



वंचित राहणार नाही याची संबंधितांनी दखल घ्यावी. येत्या १५ मेपर्यंत जास्तीत लाभार्थ्यांचा सर्व्हे करण्याचे निर्देश त्यांनी ग्रामसेवकाला दिले

# आमगाव शहरात सार्वजनिक स्वच्छतागृह तयार करा

आमगाव : आमगाव तालुक्याचे ठिकाण असल्याने येथे तालुक्यातील नागरिक दररोज विविध कामांसाठी येतात. तसेच बाजारपेठसुद्धा असल्याने ग्राहकांची ये–जा सुरू असते. मात्र शहरात सार्वजनिक स्वच्छतागृह नसल्याने नागरिकांची फार गैरसोय होते. त्यामुळे नगर परिषदेने याची दखल घेऊन ही समस्या मार्गी लावण्याची मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायत आमगाव शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून केली.

निवेदनातून रेल्वे स्थानक आमगाव ते आंबेडकर चौक आमगाव तसेच कामठा चौक आमगाव येथे स्वच्छतागृह बांधण्यात यावे. रेल्वेस्थानक आमगाव ते कामठा मार्गावर एक–दोन ठिकाणी प्रसाधनगृहांची व्यवस्था केल्यास परिसरातील व बाजारात आलेल्या ग्रामीण व शहरी नागरिकांना सोईचे होईल. तसेच आंबेडकर चौक ते पोलिस स्टेशनकडे जाणाऱ्या मार्गावर अनेकदा अपघात घडलेले आहेत. या ठिकाणी स्पीड ब्रेकर तयार करण्यात यावे.

प्राथमिक आरोग्य केंद्राजवळील खड्डा बुजविण्यात यावा आदी मागण्यांचा समावेश होता. शिष्टमंडळात अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे शाखा अध्यक्ष प्राचार्य व्ही. डी. मेश्राम, संघटनमंत्री जगदीश शर्मा, सचिव प्रा. लक्ष्मण खंडाईत, कोषाध्यक्ष बी. एम. कटरे, विधी सलाहकार ॲड. मिथून गुप्ता, डॉ. अनिल मुंजे, संतोष पुंडकर, प्रदीप बिसेन, नरेंद्र बहेटवार, डॉ. अनिल मुंजे, रमेश लिल्हारे यांचा समावेश होता.

# समृद्धी महामार्ग शेतकरी संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाची नितीन गडकरी यांच्याशी भेट



**तिरोडा:**– नागपूर गोंदिया समृद्धी एक्सप्रेसवे प्रकल्पामुळे बाधित होत असलेल्या शेतकऱ्यांच्या विविध समस्या आणि अन्यायकारक भूमिगत प्रक्रिया याविरोधात आवाज उठवण्यासाठी समृद्धी एक्सप्रेसवे शेतकरी संघर्ष समिती, तिरोडा यांचे शिष्टमंडळ केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली.

या शिष्टमंडळात डॉ. दिनदयाल पटले, सतीश पटले आणि संदीप अनकर यांचा समावेश होता. त्यांनी गडकरीना एक निवेदन सादर केले. ज्यामध्ये शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या मुख्य समस्यांवर चर्चा करण्यात आली. ज्यामध्ये कमी प्रमाणात जमीन अधिग्रहण मोबदला ,वैयक्तिक नोटीसा न देणे, बेकायदेशीर चावडी नोटीसा, पांदन रस्त्यांची व पाण्याच्या प्रवाहाची व्यवस्था न करणे, पुनर्वसनाची प्रलंबित प्रक्रीया यांचा समावेश होता.

गडकरीनी निवेदन गांभीर्याने ऐकून घेतले आणि शेतकऱ्यांच्या समस्यांकडे तातडीने लक्ष देण्यात येईल, आणि संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून योग्य तो निर्णय घेतला जाईल,असे आश्वासन दिले.

# प्रफुल्ल पटेल यांनी पदाधिकाऱ्यांसह संवाद साधून जाणून घेतल्या समस्या

**गोंदिया :**– जिल्ह्यातील नागरिक, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी यांच्याशी खासदार प्रफुल्ल पटेल यांनी रविवारी (दि.११) संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. तसेच पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी पक्ष संघटन यावर संवाद साधला. विविध संघटनांनी दिलेले निवेदन स्वीकारून त्यांच्या समस्या मार्गी लावण्याची ग्वाही खासदार प्रफुल्ल पटेल यांनी दिली. यावेळी माजी आ. राजेंद्र जैन व पक्ष पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विचारधारेवर व नेतृत्वावर विश्वास ठेवून गोंदिया व तिरोडा तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षात प्रवेश केला. खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या हस्ते पक्षाचा दुपट्टा घालून स्वागत करण्यात आले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अरुण नागोजी गजभिये, रूपेश विजयकुमार नशिने, सचिन अवस्थी, सब्बू अग्रवाल, अभय अग्रवाल, प्रकाश जगतराम, रजनी कुंभारे, दिलदार रंगारी, बनाथर येथील धनंजय गुप्ता, अशोक बरते, दिनेश दवणे, हनस बरते, कुमार बिसेन उपस्थित होते.



# देवरी, चिचगड येथे होणार १३२ केव्हीचे उपकेंद्र

**गोंदिया :**– जिल्ह्यातील देवरी चिचगड येथे प्रस्तावित १३२ केव्ही वीज उपकेंद्र गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. परिणामी कमी दाबाचा वीजपुरवठा होत असल्याने नागरिक, शेतकरी आणि उद्योजक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. या भागातील वीज समस्या दूर करण्यासाठी देवरी चिचगड येथे १३२ केव्ही उपकेंद्र उभारण्याची मागणी आ. डॉ. परिणय फुके यांनी मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. त्यांनी याची दखल घेत ऊर्जा विभागातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

सध्या देवरी व चिचगड भागात कमी दाबाचा वीजपुरवठा होत असल्याने पिण्याच्या पाण्याच्या टाक्या वेळेवर भरत नाहीत. तर, शेतकऱ्यांच्या कृषिपंपांना याचा फटका बसत होता. शेतीला आवश्यक असलेल्या सिंचनाच्या वेळा चुकत असून, घरगुती व औद्योगिक वीजपुरवठ्यात ही व्यत्यय येत होता. या विषयावर आ. डॉ. परिणय फुके यांनी अनेक वेळा संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. नागरिकांच्या सातत्याने वाढणाऱ्या तक्रारींचा आढावा घेत मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे सविस्तर माहिती दिली. देवरी तालुक्यातील सर्वच गावांमध्ये विशेषतः देवरी व चिचगडमध्ये उपकेंद्र उभारल्यास वीज दाबाचा प्रश्न कायमचा सुटणार असल्याचे सांगितले. मुख्यमंत्र्यांनी ही बाब गांभीर्याने घेत ऊर्जा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्वरित कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्यामुळे देवरी व परिसरातील नागरिकांना दिलासा मिळणार असून, पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी आणि इतर वीज गरजांसाठी स्थिर आणि पुरेसा पुरवठा होणार आहे.

# सरांडीच्या इंदिरा टोली येथे पाणीटंचाई मुळे बोरवेलचे भूमीपूजन

**तिरोडा:**– तालुक्यातील सरांडी येथील इंदिरा टोली मध्ये पाण्याची कमतरता असल्यामुळे जिल्हा परिषद गोंदिया च्या समाजकल्याण सभापती सौ रजनीताई कुंभरे यांच्या हस्ते बोरवेलचे भूमिपूजन करण्यात आले या वेळी पाहूने म्हणून पंचात समिति सदस्य कुंताताई पटले ग्रामपंचायत सरांडी च्या सरपंच सौ. मिताताई दमाहे, उपसरपंच राजुजी दमाहे, माजी सरपंच किशोरजी दमाहे ,दिनेश लिल्हारे ग्रा. प. सदस्य, प्रदिपजी कटरे, माजी ग्राम पंचायत सदस्य, भुमेस्वर बांगरे , नामदेव नंदरधने , सनोज शेंद्रे, सुनील देशमुख,आणि सर्व गावकरी मंडळी यांच्या उपस्थितीत भूमिपूजन संपन्न झाले.



# प्राथमिक आरोग्य केंद्र दरेकसा येथे हिवताप दुरीकरण कार्यशाळा

**सालेकसा:**– जिल्ह्यात हिवतापासंबधाने मागील वर्षाचे आकडेवारी बघता जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य दरेकसा अंतर्गत गावांमध्ये हिवतापाचे सर्वात जास्त रुग्ण दुषित आढळुन आलेले असल्याचे निर्दशनास आढ्ळुन आलेले आहेत.ह्या वर्षी त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या दृष्टीकोनातुन जिल्हा हिवताप अधीकारी डॉ.विनोद चव्हाण यांच्या कल्पक विचारातुन दि.२८ एप्रिल रोजी प्राथमिक अआरोग्य केंद्र दरेकसा येथे एक दिवसीय हिवताप दुरीकरण कार्यशाळा संपन्न झाली.त्यावेळी जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ.रोशन राऊत यांनी सुद्धा माता व बाल संगोपन कार्यक्रमाचा आढावा घेवुन मार्गदर्शन केले.



प्रस्तावना प्राथमिक आरोग्य दरेकसाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.पारस गिरी यांनी केले त्यात प्रामुख्याने दरेकसा कार्यक्षेत्रातील जंगलव्याप्त गावे,कामासाठी शेजारील छत्तीसगड राज्यात स्थलांतरीत होणारे मजुर,बाहेरुन आश्रमशाळेत शिकण्यासाठी येणारे विद्यार्थी याविविध विषयावर मुद्दे कार्यशाळेत मांडले.

जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.विनोद चव्हाण यांनी कमीत कमी मागील तीन वर्षात कार्यक्षेत्रात हिवताप दुषित रुग्ण आढळुन आलेल्या गावांवर जास्त लक्ष केंद्रित करुन त्या गावातील आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आशा सेविका व एम्बेड अशासकीय प्रकल्प संस्थेचे स्वयंसेवक यांच्या मदतीने गृहभेटीतुन कंटेनर सर्वे करुन डासअळी आढळुन आलेल्या घरातील भांडी,कंटेनर तपासणी कामे वाढ्विणे गरजेचे सांगितले.कामासाठी शेजारील छत्तीसगड राज्यात स्थलांतरीत होणारे मजुर,बाहेरुन आश्रमशाळेत शिकण्यासाठी येणारे विद्यार्थी या सर्वांची हिवताप जलद तपासणी गावपातळीवरच आशामार्फत (आरडीके किट) ने रक्त तपासणी करण्याचे निर्देश दिले.आठवड्यातुन एक दिवस कोरडा पाळणे, ग्रा.प. मधील पदाधिकारी यांचा सहभाग वाढविणे,लोकांमध्ये जनजागृती करण्याच्या सुचना ह्यावेळी देण्यात आल्या.जिल्हा हिवताप कार्यालयाचे कीटकशास्त्रज्ञ अनिल चोरवाडे यांनी हिवताप आजाराबाबत्त डासांची पाण्यात होणारी वाढ, डासामध्ये प्लासमोडीयम जंतुची वाढ तसेच डासांचे जीवनचक्र अशी विविध बाबीवर माहीती कार्यशाळेत दिली.आरोग्य सहाय्यक किशोर भालेराव यांनी हिवताप प्रतिबंधात्मक उपाय जसे गप्पी मासे,अँबेट सोडणे,संडास– बाथरुम च्या पाईपला व्हेंट जाळी बसविणे,मच्छरदाणीचा वापर अशा विविध बाबीवर माहीती कार्यशाळेत दिली.कार्यशाळेत पिपरियाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.महेशकर यांनी सुत्रसंचालन व डॉ.नितीन खांडेकर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यशाळेत कार्यक्षेत्राचे समुदाय आरोग्य अधिकारी,आरोग्य सेवक,आरोग्य सेविका,आशा सेविका,गट प्रवर्तक यांची उपस्थिती होती.कार्यशाळेत जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालयाचे किशोर भालेराव,आशिष बल्ले, ठाकूर, सुभाष बिसेन,नरेंद्र नागपुरे,बिसेन यांचे विशेष योगदान लाभले.


**महाराष्ट्र शासन कार्यालय**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, चंद्रपूर-४४२४०१**
**ई निविदा क्र.०४/२०२५-२६**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, चंद्रपूर–४४२४०१ (दु.क्र.०७१८४२, Email.eertibal.chandrapur@gmail.com खालील कामाकरिता महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागातील पंजिबद्ध संबंधित जिल्ह्यातील मजुर सहकारी संस्था यांचेकडून ब–१ नमुण्यातील ई निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावरून (http://mahatenders.gov.in) डाउनलोड करण्यात यावी. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत (रुपये) | कंत्राटदाराची वर्गवारी | बयाना रक्कम (रुपये) | निविदा किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रकल्प कार्यालय देवरी.ता. देवरी. जिल्हा गोंदिया येथे रेकार्ड रुमचे बांधकाम करणे | २४,४९,९४४ | वर्ग ब व त्यावरील | सुट | ५९०/– |
| २ | प्रकल्प कार्यालय देवरी, ता. देवरी. जिल्हा गोंदिया येथे क्वार्टरचे हॉल बांधकाम करणे | १२,६७,४९४ | वर्ग ब व त्यावरील | सुट | २९०/– |

**खालील संकेतस्थळावर ई–निविदांची सर्व माहिती उपलब्ध आहे.**
१.(http://mahatenders.gov.in) (सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
२.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, चंद्रपूर–४४२४०१ यांचे कार्यालयातील सुचना फलक

**(नितीन मुत्यालवार)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग चंद्रपूर**

जिमाका/गों/जाहि/०९/२०२५

# तीन वर्षांची प्रतीक्षा संपणार,बिगुल वाजणार

## गोंदिया,तिरोडा नगर परिषद निवडणूक

**गोंदिया :** गोंदिया आणि तिरोडा नगर परिषदेची निवडणूक गेल्या तीन वर्षापासून रखडली होती. तसेच नवनिर्मित आमगाव नगरपरिषदेचा वाद संपला असून नगरपंचायत म्हणून निवडणूक घेण्याचे निर्देश देण्यात आल्याने गेल्या सात वर्षापासूनची प्रतिक्षा संपली आहे. परिणामी, या दोन्ही नगर परिषदेत गेल्या तीन वर्षांपासून व आमगाव येथे सात वर्षापासून प्रशासकराज आहे. त्यामुळे इच्छुकांच्या नजरा नगर परिषदेची निवडणूक केव्हा जाहीर होते, याकडे लागल्या होत्या. मंगळवारी (दि. ६) सर्वोच्च न्यायालयाने यासंबंधीच्या याचिकेवर सुनावणी करताना रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सप्टेंबरपर्यंत घेण्याचा आदेश राज्य सरकारला दिला. त्यामुळे तब्बल तीन वर्षांनंतर नगर परिषद निवडणुकीचा मुहूर्त निघणार आहे.

जिल्ह्यात गोंदिया आणि तिरोडा या दोन नगर परिषदा आहेत. या दोन्ही नगर परिषदेच्या तत्कालीन पदाधिकाऱ्यांचा पाच वर्षाचा कार्यकाळ ९ फेब्रुवारी २०२२ रोजी पूर्ण झाला. पण ओबीसी आरक्षणावरून तिढा निर्माण झाल्याने या दोन्ही नगर परिषदेचा निवडणूक कार्यक्रम लांबणीवर गेला. तेव्हापासून या दोन्ही नगर परिषदेवर प्रशासकराज आहे. या दोन्ही नगर परिषदेवर सत्ता



**गोंदिया नगर परिषदेतील पक्षीय बलाबल (सन २०१७)**
**भाजप १८, राष्ट्रवादी काँग्रेस ०७, काँग्रेस ०९, बसपा ०५, शिवसेना ०२, अपक्ष १**
**तिरोडा नगर परिषदेतील पक्षीय बलाबल (सन २०१७)**
**भाजप ५, काँग्रेस ०, राष्ट्रवादी काँग्रेस ०८, शिवसेना ०३, अपक्ष १**

स्थापनेवरून स्थानिक नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागलेली असते. एकूण ४२ सदस्यांनी गोंदिया नगर परिषदेत सन २०१७ च्या निवडणुकीत भाजपने सत्ता स्थापन केली होती. तेव्हा नगराध्यक्षाची निवड ही थेट जनतेतून करण्यात आली होती. यात भाजपचे अशोक इंगळे यांची नगराध्यक्षपदी निवडून आले होते. या नगर परिषदेची निवडणूक ही अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाते. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खा. प्रफुल्ल पटेल यांचे हे गृहक्षेत्र असल्याने व भाजप आ. विनोद अग्रवाल, काँग्रेस नेते माजी आ. गोपालदास अग्रवाल या नेत्यांमुळे येथील निवडणूक ही चुरशीची आणि प्रतिष्ठेची मानली जाते. पण गेल्या तीन वर्षांत बरेच समीकरण बदलले आहे. आता महाविकास आणि महायुती हे नवीन समीकरण तयार झाले आहे. त्यामुळे नगर परिषद निवडणुका याच समीकरणाने होतात की पुन्हा वेगळे समीकरण तयार होते, यावर बरेच राजकीय गणित अवलंबून आहे.

तीन नगर पंचायतीकडे लागले आहे लक्ष जिल्ह्यातील आमगाव, सालेकसा, गोरेगाव नगर पंचायतीची निवडणूक गेल्या तीन वर्षांपासून लांबणीवर पडली होती. मात्र, या आता नगर परिषद निवडणुकांसोबत या दोन्ही नगर पंचायतींची निवडणूक जाहीर होण्याची शक्यता असल्याने याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

### लोकसभा निवडणुकीत दोन्ही न.प. क्षेत्रात भाजपला कल

**सन २०२४ मध्ये पार पडलेल्या भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत गोंदिया आणि तिरोडा या दोन्ही नगर परिषद क्षेत्रात भाजपचे उमेदवार सुनील मेंढे यांना ५० हजारांवर मताधिक्य मिळाले होते. तर काँग्रेसचा उमेदवार या दोन्ही नगर परिषद क्षेत्रात माघारला होता.**

### विजय रहांगडाले यांच्यासाठी प्रतिष्ठेची निवडणूक

**एकूण १७ सदस्य असलेल्या तिरोडा नगर परिषदेत गेल्या निवडणुकीत भाजपने सत्ता स्थापन केली होती. सोनाली देशपांडे यांची नगराध्यक्षपदी निवड झाली होती. भाजपचे आ. विजय रहांगडाले यांच्या गृहक्षेत्रातील ही निवडणूक असल्याने स्थानिक राजकारणावर पकड मजबूत करण्यासाठी या नगर परिषदेवर सत्ता असणे गरजेचे आहे. ही निवडणूक आ. विजय रहांगडाले यांच्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.**

### प्रफुल्ल पटेल यांच्याकरिता प्रतिष्ठेची निवडणूक

**राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते खा. प्रफुल्ल पटेल यांच्यावर गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील राजकारण अवलंबून असते. ते केंद्र आणि राज्यातील वजनदार नेते आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी या दोन्ही नगर परिषदेची निवडणूक तेवढीच प्रतिष्ठेची आहे. तर काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष आ. नाना पटोले यांचे सुद्धा हे गृहक्षेत्र असल्याने त्यांच्याकरिता सुद्धा या दोन्ही नगर परिषदेची निवडणूक प्रतिष्ठेची आहे. गोंदियाचे विद्यमान आ. विनोद अग्रवाल आणि तिरोडा आ. विजय रहांगडाले यांचा सुद्धा या निवडणुकीत चांगलाच कस लागणार आहे.**

### महायुती, महाविकास आघाडी की स्वतंत्र ?

**राज्यातील लोकसभा आणि विधानसभा निवडणुका या महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेतृत्वात लढविण्यात आल्या होत्या. पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या स्वतंत्रपणे लढविण्याचा सूर आळवला जात आहे. पण वरिष्ठ नेते नेमके काय निर्णय घेतात, यावर या निवडणुकांचे बरेच समीकरण अवलंबून असणार आहे.**

# एमआयडीसीत ५३ उद्योगांना टाळे

**गोंदिया::-** बेरोजगारांची फौज दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. त्यादृष्टीने जिल्ह्यात उद्योग नसल्याने त्यांच्या हाताला काम मिळत नाही. केवळ शेतीवर येथील अर्थव्यवस्था अवलंबून आहे. जिल्ह्यातील चार तालुक्यांत महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाने जागा अधिग्रहित केली. मात्र उद्योग स्थिरावलेले नाहीत. तर उर्वरीत चार तालुक्यांना अद्यापही एमआयडीसीची प्रतीक्षा आहे. गोंदिया नजीक असलेल्या मुंडीपार येथे एमआयडीसीचे ९८ उद्योगांची नोंद आहे. त्यापैकी तब्बल ५३ उद्योगांना टाळे ठोकण्यात आले आहे. परिणामी रोजगाराचा प्रश्न भस्मासुरासारखा उभा ठाकला आहे.

गोंदिया शहरातून देशाच्या चारही बाजूला जोडली जाणारा रेल्वेमार्ग गेला आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय महामार्ग देखील आहे. या जिल्ह्यात मुबलक प्रमाणात जमीन आणि पाणी देखील उपलब्ध आहे. अशा अवस्थेत देखील गोंदिया जिल्ह्यातील अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने शेतीवर आधारित आहे. या भागात सर्वाधिक धानाचे उत्पादन घेतले जाते. त्यामुळे येथे धानावर आधारित राईस मिल उद्योग सर्वात मोठा उद्योग आहे. जिल्ह्यात जवळपास १५५ वर राइस मिल आहे. येथील तांदळाची देश व विदेशात निर्यात केली जाते. गोंदिया येथील एमआयडीसीमध्ये सुद्धा राइस मिल उद्योग मोठा होता. तर, धानाच्या कोड्यांपासून वीज तयार

### रोजगारासाठी मोठ्या शहरांकडे धाव

**मुंडीपार येथील एमआयडीसीत उद्योगासाठी एकूण १४६ हेक्टर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पण, यापैकी अनेक भूखंड गेल्या वीस ते २५ वर्षापासून रिकामे पडले आहेत. त्यांचा कसलाही उपयोग होत नसल्याचे चित्र आहे. तर, या ठिकाणी उद्योग स्थापन व्हावे, यासाठी कुठलेच प्रयत्न केले जात नसल्याचे चित्र आहे. येथील एमआयडीसीतील उद्योग पूर्णक्षमतेने सुरू झाल्यास १५ हजारांवर बेरोजगारांना रोजगार मिळू शकतो. पण, येथील अनेक उद्योग बंद पडले असल्याने अनेकांना रोजगाराच्या शोधात पुणे, मुंबई, नागपूर येथे धाव घ्यावी लागत आहे.**



करण्याचा प्रकल्प एमआयडीसीत सुरू होता. पण, गेल्या चार पाच वर्षांपासून तो सुद्धा बंद पडला आहे. परिणामी अनेकांचा रोजगार बुडाला. येथील एमआयडीसीत उद्योगांसाठी १४६.१४ हेक्टर जागा उपलब्ध करून देत १९७ प्लॉट उद्योगजकांना विविध उद्योगांसाठी उपलब्ध करुन देण्यात आले. त्यापैकी ११० प्लॉटवर राइस मिल, प्लास्टिक प्लांट, स्वामी नस प्रकल्प, छोटे-छोटे इतर उद्योग सुरू करण्यात आले होते. पण, कालांतराने विविध अडचणींमुळे यातील अनेक उद्योग बंद पडले. त्यामुळे सद्यःस्थितीत येथे केवळ ४५ उद्योग सुरू आहेत. यातही सर्वाधिक राइस मिलचा समावेश असून, त्यामुळे ७०० जणांना रोजगार उपलब्ध असल्याची माहिती एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी दिली. गेल्या आठ-दहा वर्षांत एमआयडीसीत एकही नवीन उद्योग स्थापन झाला नाही. उलट जे उद्योग सुरू होते, त्यापैकी काही बंद झाले आहे. काही उद्योगांना कुशल रोजगार न मिळाल्याने ते बंद पडल्याची माहिती आहे. त्यामुळे येथील एमआयडीसी केवळ नाममात्र ठरत आहे.

एमआयडीसीमध्ये उद्योग सुरू करण्यासाठी उद्योजकांना प्लॉट उपलब्ध करून देण्यात आले. यापैकी कित्येकांनी गेल्या वीस-पंचवीस वर्षांपासून त्या ठिकाणी कुठलाच उद्योग सुरू केला नाही. केवळ प्लॉटवर कब्जा करून ठेवला आहे. मात्र, त्यांच्यावर एमआयडीसी प्रशासनाकडून कुठलीच कारवाई करण्यात आली नाही.

# ३० ग्रामपंचायतींना इमारतीची प्रतीक्षा कायम

**गोंदिया-.** नक्षलग्रस्त आदिवासी जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोंदिया जिल्ह्यात सद्यस्थितीत ५४५ ग्रामपंचायती आहेत. यापैकी ३० ग्रामपंचायतींना जागाच उपलब्ध नसल्यामुळे या ग्रामपंचायतींचा कारभार भाड्याच्या इमारतीतून सुरू आहे. १२६ ग्रामपंचायतीचा कारभार जीर्ण इमारतीतून सुरू असल्याची बाब पुढे आली आहे.

देशाने पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात आणली आहे. त्या माध्यमातून ग्रामपंचायत हा केंद्रबिंदू मानून या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून योजना राबविण्यात येतात. त्यामुळे ही संस्था महत्त्वाची मानली जाते. आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील जनतेला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु आदिवासींच्या उत्थानासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना किंवा त्यांना दिला जाणारा लाभ हा ग्रामपंचायतींच्या माध्यमातून देण्यात येते. परंतु गोंदिया जिल्ह्यातील १२६ ग्रामपंचायतीच दुर्बल घटकात असल्याचे वास्तव चित्रण गोंदिया जिल्ह्यात पाहावयास मिळत आहे. आमगाव तालुक्यातील एका ग्रामपंचायतीला स्वतःची इमारत नाही. अर्जुनी मोरगाव १, गोरेगाव १३, सालेकसा ४, तिरोडा तालुक्यातील ११ ग्रामपंचायतींना स्वतःची जागा नाही. या ३० ही ग्रामपंचायतींकडे जागा आहे. परंतु इमारत नाही अशी अवस्था आहे. जिल्ह्यातील ९६ ग्रामपंचायतींच्या इमारती अत्यंत जीर्ण झाल्यामुळे त्या ग्रामपंचायतच्या इमारती बांधण्याची नितांत गरज आहे. आमगाव तालुक्यातील १० ग्रामपंचायतीच्या जीर्ण झाल्या आहेत. अर्जुनी मोरगाव तालुक्यातील १९, देवरी १९,




### ३७८ ग्रा. पं. मध्ये सेवा केंद्रासाठी स्वतंत्र खोली नाही

**शासनाने प्रत्येक ग्रामपंचायतीत आपले सरकार सेवा केंद्र प्रत्येक ग्रामपंचायतीत सुरू केले. या सेवा केंद्रासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीत एक स्वतंत्र खोली असणे आवश्यक आहे. परंतु गोंदिया जिल्ह्यातील ५४५ ग्रामपंचायतींपैकी ३७८ ग्रामपंचायतमध्ये या सेवा केंद्रासाठी स्वतंत्र खोली नाही. त्यात आमगाव तालुक्यातील ३१ ग्रामपंचायतमध्ये, अर्जुनी मोरगाव ६९, देवरी २७, गोंदिया १०६, गोरेगाव ५५, सडक अर्जुनी ६२, सालेकसा ११. तिरोडा १७ ग्रामपंचायतींमध्ये स्वतंत्र खोली देण्यात आली नाही. अशी दुरवस्था ग्रामपंचायतींची गोंदिया जिल्ह्यात आहे.**

गोंदिया १६, गोरेगाव ६, सडक-अर्जुनी १५, सालेकसा १ व तिरोडा १० ग्रामपंचायतच्या इमारती जीर्ण आहेत. महाराष्ट्र शासनाची महत्त्वाकांक्षी योजना मग्रारोहयो, महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम, १४ वित्त आयोगाची कामे, विशेष देखभाल दुरूस्ती व शासनाच्या कुठल्याही योजनांचा फायदा घ्याचा असेल तर ग्रामपंचायतशिवाय पर्याय नाही. परंतु गोंदिया जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना स्वतःचे छत नसल्यामुळे भाड्याच्या खोलीतून योजनांचा पाठपुरावा करावा लागत आहे. सर्वात महत्त्वाच्या या स्थानिक स्वराज्य संस्थेलाच आपल्या अस्तित्वासाठी लढावे लागत

असल्यामुळे प्रशासन आणि शासन याकरीता किती सजग आहे हे दिसून येते. राबविण्यात येणाऱ्या योजना : संसद आदर्श ग्राम योजना, आमदार आदर्श ग्राम योजना, पंचायत राज सशक्तीकरण योजना, चौदावा वित्त आयोग, अल्पसंख्याक योजना, ग्राम पंचायतीची घर कर व पाणीपटटी कर वसूली., जिल्हाप ग्राम विकास निधी, जिल्हा स्तरावर बाजाराचे लिलाव करणे., पंचायत समिती स्तरावर मत्स्यपालन तलावाचे लिलाव करणे याशिवाय नागरिकांचे कॉर्नर अंतर्गत नमुना ८, असेसमेंट दाखला, दारिद्रय रेषेखालील दाखला, जन्म दाखला, मृत्यू दाखला, विवाह दाखला, थकबाकी नसल्याचा दाखला, निराधार योजने करीता वयाचा दाखला देण्यात येतो.

# मोहाडी ते चोपा रस्ता अर्धवट सोडून ठेकेदार पसार

**गोरेगाव:-** तालुक्यातील मोहाडी ते चोपा या तीन किमी रस्त्यावरून वाहनधारकांना प्रवास करणे कठीण झाले आहे. रस्त्याचे अर्धवट काम करून सदर कंत्राटदाराने कामाकडे मागील दीड महिन्यांपासून पाठ फिरवून पसार झाला आहे. त्यामुळे नागरिकांनी आणखी किती दिवस रस्त्याअभावी हाल सहन करावेत, हा गंभीर प्रश्न निर्माण केला आहे.

मोहाडी ते चोपा नव्हे तर, गोरेगाव तालुक्याच्या ग्रामीण भागातील रस्त्याची परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच भयावह होत चालली आहे. परंतु, ठेकेदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी

मूग गिळून गप्प आहेत. परिणामी, परिसरातील मोहाडीपासून चोपापर्यंत गाव-खेड्यातील नागरिक, वाहनधारक, विद्यार्थी वर्गाला अर्धवट अवस्थेत असलेल्या रस्त्याचा, रस्त्यावरील खड्डे, तसेच चढ उताराच्या रस्त्याचा नाहक त्रास सहन

करावा लागत आहे. परिसरातील मोहाडी ते चोपासह, मोहाडी, आकोटोला, कनारटोला, चोपा अर्धवट बांधकाम झालेल्या रस्त्यावरील पडलेल्या भेदक खड्यांमुळे रस्त्याची बिकट अवस्था झाली आहे. मागील दीड महिन्यांपासून अर्धवट रस्त्याचे बांधकाम व गावात प्रवेश करणाऱ्या रस्त्यावरील जीवघेणे खड्डे हे जशास तसे आहेत.

याकडे ना ठेकेदारांचे लक्ष आहे ना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कुठल्या अधिकाऱ्याचे. याबाबत मागील एक महिन्यापासून मोहाडी ग्रामपंचायत सरपंचासह अनेक नागरिकांनी संबंधित

विभागाला वारंवार तक्रारी केल्या. थेट तालुक्याला जाणाऱ्या तीन किलोमीटरच्या रस्त्यात गिट्टी, खड्डे, मुरुम, रस्त्याचा चढ-उतार असल्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. अनेक वाहनांचे वेळेपूर्वीच देखभाल



दुरुस्तीचे काम करावे लागते. पर्यायी शारिरीक आरोग्यासोबतच अर्थिक तसेच मानसिकही नुकसान सहन करावे लागत आहे. अर्धवट रस्त्याचे त्वरीत काम पूर्ण करून रस्त्यावरील खड्डे बुजविण्याची मागणी मोहाडी ग्रामपंचायतचे सरपंच नरेंद्र कुमार चौरागडे यांच्यासह अन्य नागरकि उपस्थित होते.

# मिनी मंत्रालयाचे जलरथ कंत्राटदारांच्या दावणीला

**गोरेगाव:-**तालुक्यात मोठ्या प्रमाणात शासकीय योजनांच्या माध्यमातून बांधकाम सुरू आहेत. या बांधकामांवर जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठ्यासाठी देण्यात आलेल्या जलरथांचा वापर करण्यात येत आहे. तालुक्यात मोठ्या प्रमाणात पाण्याची टंचाई असताना त्या जलरथांच्या माध्यमातून पाणीपुरवठा न करता ते कंत्राटदारांच्या दावणीला बांधण्यात आले असल्याने नागरिकांकडून रोष व्यक्त करण्यात येत आहे.

जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष पंकज रहांगडाले यांच्या कार्यकाळात ग्रामीण भागात पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी १५ व्या वित्त आयोगांतर्गत जल रथ गावांमध्ये पाण्याची सतत जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाकडून जिल्ह्यातील बहुतेक गावांमध्ये जलरथ उपलब्ध करून देण्यात आले आहेत. गोरेगाव तालुक्यातील सोनी, हिरडामाली,




मुंडीपार, कुऱ्हाडी सारख्या मोठ्या समस्या आहे. या समस्येचे निराकरण करण्यासाठी, प्रशासनाने ग्रामस्थांना जलरथ उपलब्ध करून दिले. ते जलरथ उपयोगात आणण्याची जबाबदारी ग्राम पंचायतींची आहे. मात्र हे जलरथ कंत्राटदारांसाठी वरदान ठरत आहेत. ज्या गावांमध्ये बांधकाम सुरू आहे, तिथे या जलरथाचा वापर खुलेआम केला जात आहे.

अनेक गावांमध्ये महिलांना पाण्यासाठी दूरवर धावावे लागते. अशा वेळीच जल रथांची आवश्यकता असते, परंतु जनतेची सेवा करण्याऐवजी, बांधकाम कामासाठी कंत्राटदारांना जल रथ दिले जात आहेत. कंत्राटदार स्थानिक असल्याने त्यांना जल रथासाठी ग्रामपंचायतीची परवानगी घेणे आवश्यक वाटत नाही. अशा परिस्थितीत गावातील नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. बांधकामासाठी परवानगीशिवाय जलरथ वापरणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करण्याची गरज आहे, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# मंगेझरी व मुरमाडीच्या सरपंचाचे राष्ट्रवादीत प्रवेश



**तिरोडा:-** तालुक्यातील मंगेझरी व मुरमाडी येथील सरपंचानी खा. प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. गोंदिया येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी भवन येथे मंगेझरीच्या सरपंचा छायाताई टेकाम व मुरमाडीच्या सरपंचा सौ. मंदाताई टेंभरे यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. माजी आमदार राजेंद्र जैन यांनीपक्षाचा दुपट्टा देवून स्वागत केले.

खा. प्रफुल पटेल यांच्या विकासात्मक धोरणांवर व सक्षम नेतृत्वावर विश्वास ठेवून अनेक पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करीत आहेत.

जगदीश बावनथडे यांच्या प्रयत्नाने मंगेझरीच्या सरपंचा छायाताई टेकाम व मुरमाडीच्या सरपंचा सौ. मंदाताई टेंभरे यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. माजी आमदार राजेंद्र जैन यांनी पक्षाचा दुपट्टा देवून स्वागत केले. पक्ष प्रवेशामुळे या तालुक्यात निश्चितच संघटन शक्ती वाढेलव पक्ष मजबूत होणार असल्याचे व्यक्त केले.

याप्रसंगी राजेंद्र जैन, कुंदन कटारे, बाळकृष्ण पटले, जगदीश बावनथडे, पूजा अखिलेश सेठ, अश्विनी पटले, कीर्ती पटले, सरला चिखलोंडे, शिवलाल जमरे, नानू मुदलियार, रवी पटले, नीरज उपवंशी, सुनील पटले, नितिन टेंभरे सहित पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

# कामचुकार कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई

**सडक अर्जुनी:-** जिल्हा परिषद शाळा वाचली पाहिजे यासाठी सहकार्य करण्याची गरज आहे. एवढेच नव्हे तर हे सर्व करीत असताना डिजिटल शिक्षण सुविधा करणे सुद्धा आवश्यक आहे. सोबतच घरकुल बांधकामाचे जे सर्वेचे काम सुरू आहे ते १५ मे पर्यंत योग्य पद्धतीने झाले शिवाय तालुक्यातील इतर समस्या मार्गी लावण्याचे निर्देश जि. प. अध्यक्ष लायकराम भेडारकर यांनी दिले. स्थानिक पंचायत समिती येथे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सर्व विभागांचा आढावा घेवुन कामचुकार अधिकाऱ्यांवर कारवाई होणार, असे संकेतही अध्यक्षांनी दिले.

पंचायत समिती अंतर्गत सुरू असलेल्या व प्रस्तावित विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी ९ मे रोजी बैठक




पंचायत समितीच्या सभागृहात जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.बैठकीला प्रामुख्याने समाज कल्याण सभापती रजनी कुंभरे, पं.स. सभापती चेतन वडगाये, उपसभापती निशा काशिवार, जि. प. सदस्य डॉ. भुमेश्वरजी पटले, पंचायत समिती सदस्य चंद्रकलाताई डोंगरवार,संगीताताई खोब्रागडे,शालिंदरजी कापगते, डॉ. रुकीराम वाढई, वर्षा शहारे, सपना नाईक, शिवाजी गहाणे, सरपंच संघटनेचे तालुका अध्यक्ष हर्ष मोदी,मनरेगा गटविकास अधिकारी लोहबरे,सहा.गटविकास अधिकारी खोटेले, गटविकास अधिकारी रविकांत सानप यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

आढावा बैठकीच्या प्रसंगी विविध विभागांचा आढावा घेत असताना ते बोलत होते. यावेळी उपस्थित ग्रामसेवक व कर्मचारी विविध विभागांचे अधिकारी, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य आणि इतर लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत शिक्षण, पाणी, महिला सक्षमीकरण, गृहनिर्माण, जलसंधारण आणि रोजगार निर्मिती यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. उन्हाळ्यातील पाणीटंचाई लक्षात घेता मगाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेची प्रभावी अंमलबजावणी, विहिरीचे पुनर्भरण, जलसंधारण प्रकल्प, तसेच टँकरद्वारे पाणीपुरवठा या उपाययोजनांवर भर देण्यात आला. लोकसहभागातून जलव्यवस्थापन न करण्यावरही करण्यावरही चर्चा झाली. तसेच जल जीवन मिशन अंतर्गत अनेक गावातील कामे अपूर्ण असल्याने यातील

काही काम चुकार लोकांवर सुद्धा आपण योग्य ती कारवाई केली असल्याचे सांगण्यात आले. बैठकीमध्ये जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांची घटती संख्या ही चिंतेची बाब म्हणून मांडण्यात आली. या पार्श्वभूमीवर शिक्षकांची नियमित उपस्थिती, गुणवत्तापूर्ण शिक्षण, विद्यार्थ्यांना आकर्षक उपक्रम व प्रोत्साहन, शालेय सुविधा आणि पोषण आहार या बाबींवर भर देण्याचे निर्देश देण्यात आले.

# मोहगाव येथे तलाव खोलीकरणला प्रारंभ

**गोरेगाव:-** तालुक्यातील मोहगाव ग्राम पंचायतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. त्यामुळे जिल्हास्तरीय पुरस्कार देखील मिळाला. आता नाम फाउंडेशनच्या सहकार्याने तलाव खोलीकरणाचे काम मंजूर करण्यात आले. त्या कामाचे भूमिपूजन आ. विजय रहांगडाले यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यातील मोहगाव या लहानशा गावाने मोठी कामगिरी करत ग्रामपंचायतीच्या पातळीवर लाखो रुपयांच्या पुरस्कार ग्रामपंचायत स्तरावर

तसेच जिल्हा स्तरावर पटकावला. त्यानंतर आता गावात जलसंधारणाची कामे हाती घेण्यात आली आहेत. डॉ. एपीजे अब्दुल कलाम महिला बचत भवन आणि तलाव खोलीकरणाचे काम करण्यात येणार आहे. त्याचे भूमिपूजन आ. राहांगडाले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्य



कार्यपालन अधिकारी, गोरेगाव पंचायत समितीचे माजी सभापती मनोज बोपचे, सभापती चित्ररेखा चौधरी, ग्राम पंचायत मोहगाव उपसरपंच कमलेश रहांगडाले, खंडविकास अधिकारी गौतम, विस्तार अधिकारी बिसेन आणि गावकरी उपस्थित होते. मजल ही जीवन हैफ

या उक्तीला साजेसे काम गावात सुरू असून, आगामी काळात मोहगाव ग्राम हे इतर गावांसाठी आदर्श ठरणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगानंथम एम यांनी गोंदिया जिल्ह्यात नाम फाउंडेशनच्या माध्यमातून तसेच नाना पाटेकर यांच्या नेतृत्वात तलावातील गाळ काढण्यात येत आहे.

ते गाळ गावामध्ये ज्या ज्या ठिकाणी खड्डे आहेत त्या त्या ठिकाणी आणि शेतकऱ्यांना शेतात घालण्याकरिता, घराचे बांधकाम आदींसाठी देण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत गावे पाण्याच्या बाबतीत सक्षम होतील, असे त्यांनी सांगितले.